माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : ७६५/२०२२**

**अपिलार्थी – श्री. वसंता उदारामजी बावनकर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,**
**उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक,**
**भूमी अभिलेख कार्यालय, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१२.२०२१ | १४.०१.२०२२ | २०.०१.२०२२ | १४.०२.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि. २०.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "गैरअर्जदारावर पोलीस स्टेशन खापरखेडा येथे गुन्हा नोंद केल्याचा उत्तराची सत्यप्रत मिळणेबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, "आपण मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने आपण दि. ३०.११.२०२१ चे आपले पत्राचे उत्तर पाठविण्यात आले. आपण त्याची सत्यप्रत मागणी केल्याने नियमानुसार शुल्क भरून माहिती घेऊन जावी", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. २०.०१.२०२२** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जोडपत्र अ मध्ये मागितलेली माहिती १ महिना होऊनही मिळाली नाही " असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून, "प्रस्तुत प्रकरणी अपिलदार यांना त्यांचे अर्जाची माहिती पुरविण्यात आली आहे", असे नमूद करून अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)नुसार आयोगाकडे दि. १६.०३.२०२२ रोजी "मागितलेली माहिती संबंधित विषयाला धरून दिली नाही" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. १६.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. १३.०५.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. वसंता उदरामजी बावनकर व्यक्तिशः उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. वसंता उदारामजी बावनकर यांनी दि. २०.१२.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार मौजा दहेगाव (रं.) येथील शेत सर्व्हे नं. ४८/१, मो.र.क्र. ११२८/२०१४, मोजणी दि. ०९.०४.२०१४ व दि.२०.१०.२०१४ ची खोटी प्रत तयार करून ती खरी 'क' प्रत असल्याचे भासवून अर्जदाराची शेत जमीन बळकावल्यासंदर्भात दाखल तक्रार अर्ज व माहिती अर्ज दाखल केला आहे. यावर याआधी दिलेला प्रतिसाद योग्य नसल्याचा आक्षेप नोंदवित अपिलकर्ता यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यात जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क माहिती देण्याबाबत याआधीच अपिलकर्ता यांना कळविले असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत, अपिलकर्ता यांना माहिती पुरविण्यात आली असल्याचे नोंदवित निकाली काढण्यात आला होता. अपिलकर्ता यांचा मूळ आक्षेप हा उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालयाकडून तसेच पोलीस स्टेशन, खापरखेडा तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी यांच्यावतीने देण्यात आलेला असमाधानकारक प्रतिसाद असून प्रत्यक्षात खोटी 'क' प्रत जोडून जमीन बळकावण्याचा प्रकार झाला असतानाही यात प्राधिकरणाकडून कुठलीही कार्यवाही होत नसल्याबाबत अपिलार्थी यांनी नापसंती व्यक्त केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी विद्यमान उप अधिक्षक, भूमी अभिलेख, सावनेर यांच्यावतीने दि. २६.०७.२०२१, दि. १७.०८.२०२१ व दि. १७.०१.२०२४ रोजी प्रतिसाद देण्यात आला असून यातील दि. १७.०१.२०२४ रोजीचे पत्र हे स्वयंस्पष्ट असून श्री. बावनकर यांनी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने मौजा दहेगाव (रं.) येथील शेत सर्व्हे नं. ४८/१, मो.र.क्र. ११२८/२०१४, मोजणी दि. ०९.०४.२०१४ व दि.२०.१०.२०१४ ची जोडलेली 'क' प्रत ही मुळ अभिलेखाशी मेळ खात नसल्याचे दिसून येते. तसेच सदर मुळ 'क' प्रत ही 'पूर्वेकडील असलेली विहीर' हे चिन्ह खाडाखोड केल्याचे दिसून येते. तरी सदर प्रकरणी मोजणी करणारे श्री. उकंडराव बालाजी व्यवहारे यांनी अपील प्रकरणी जोडलेली 'क' प्रत ही खोटी व शासनाची दिशाभूल करणारी असल्याने त्याविरुध्द रितसर कार्यवाही करण्यात आली असे त्यात नमूद केले असून वरील पत्र हे पोलीस निरीक्षक, खापरखेडा व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांना अग्रेषित करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांच्या मुळ जोडपत्र अ नुसार त्यांना प्रत्यक्षात पोलीस स्टेशन, खापरखेडा यांनी कार्यवाही करणे अपेक्षित असून उप अधिक्षक, भूमी अभिलेख यांच्यावतीने प्रस्तुत प्रकरणी स्वयंस्पष्ट पत्र निर्गमित करणे अपेक्षित होते. या प्रकारचे पत्र हे दि. १७.०१.२०२४ रोजी उपअधिक्षक, भूमी अभिलेख, सावनेर या कार्यालयाच्या वतीने निर्गमित केले असल्याचे आढळून येते. प्रस्तुत प्रकरणी दि. २६.०७.२०२१, दि. १७.०८.२०२१ व दि. १७.०१.२०२४ रोजी दिलेले पत्र तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०१.२०२२ रोजी दिलेला प्रतिसाद, त्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी

यांनी पारित केलेला आदेश व नुकतेच जारी केलेले पत्र यांचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांना अपेक्षित असणारी माहिती व पोलीस स्टेशन, खापरखेडा यांना 'क' प्रत ही खोटी व दिशाभूल करणारी असल्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल हा सादर करण्यात आला असल्यामुळे प्रस्तुत अपील अर्ज हा निकाली काढण्यास हरकत नाही. असे करित असतानाच पोलीस स्टेशन, खापरखेडा येथे अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने व उप, अधिक्षक, सावनेर यांनी दि. १७.०१.२०२४ रोजी निर्गमित केलेल्या पत्राच्या अनुषंगाने नियमांतर्गत प्रचलित कायद्यानुसार व प्रक्रियेनुसार योग्य ती कार्यवाही लवकरात लवकर करण्याच्या सुचनेसह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.०५.२०२४**

जावक क्रमांक ----------3714----------दिनांक ---27 JUN 2024---

c:\users\rma\desktop\prajakta\appeal order\13.5.2024\765-2022.docx